# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील पोलीस कर्मचारी व अधिकारी यांना मिळणा-या साप्ताहिक सुट्टीच्या मोबदल्यात देण्यात येणा-या दरात वाढ करण्याबाबत

**(१) ३१५७ (१५-०१-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस कर्मचारी व अधिकारी यांना मिळणाऱ्या साप्ताहिक सुट्टीच्या मोबदल्या देण्यात येणा-या दरात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने आजतागायत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१८) :** (१), (२),(३) व (४) पोलीसांना सुट्टीच्या मोबदल्यात द्यावयाच्या दैनिक भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

### ठाणे शहरात फोर-जी सेवेसाठी रिलायन्स मार्फत केबल टाकण्यासाठी रस्ते खोदाईच्या कामात गैरव्यवहार

**(२) १७८९३ (११-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात फोर-जी सेवेसाठी रिलायन्स मार्फत केबल टाकण्यासाठी रस्ते खोदाईच्या कामात गैरव्यवहार होत असल्यासंदर्भात लाचलुचपत विभागामार्फत सुरु असलेली चौकशी पूर्ण झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी करण्यात येत असलेली कारवाई अद्याप पूर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर प्रकरणी दोषीवर कारवाई करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०३-२०१८) :** (१), (२) व (३) याविषयी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त तक्रार अर्जाची लाचलुचपत प्रतिबंधक विभागा मार्फत पडताळणी केली असता तक्रारीत तथ्य आढळून न आल्याने सदरचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

---

## सिंधुदुर्ग जिल्हयात वॉटर स्पोटर्सला चालना देण्याबाबत

**(३) २९७१५ (२१-०१-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील देवगड, मालवण व वेंगुर्ला येथील स्थानिक युवकांनी वॉटर स्पोर्ट उपलब्ध करुन दिले असतांना शासनाने वॉटर स्पोर्टसाठी जिल्हयात केवळ एकच स्थळ निश्चित केल्याने जिल्हयांवर अन्याय झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अस्तित्वात असलेली व अधिकची ठिकाणे निश्चित करुन सिंधुदुर्ग जिल्हयात वॉटर स्पोटर्सला चालना देऊन युवकांना रोजगार मिळवून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०३-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या बंदर हद्दीमध्ये इच्छुक व्यक्ती/संस्था/कंपनी यांच्याकडून जलक्रिडा प्रकल्प चालविण्यास दिनांक ३०.९.२०१७ रोजीच्या वर्तमानपत्रात तसेच बोर्डाच्या वेबसाईटवर जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती. या जाहिरतीत सिंधुदूर्ग जिल्हयातील किरणपाणी (आरोंदा-तेरेखोल, रेडी (शिरोडा), वेंगुर्ला, निवती, मालवण, आचरा, देवगड व विजयदुर्ग या बंदरांचा समावेश होता. तसेच नमूद केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी इच्छुकांनी अर्ज सादर करावेत, सदर ठिकाण हे भौगोलिकदृष्ट्या वाहतूक करण्यास सुरक्षित असल्यास जागेची उपलब्धता, याबाबी विचारात घेऊन परवानगी देण्यात येईल असे नमूद करण्यात आले होते. त्या अनुषंगाने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास अर्ज प्राप्त झाले असून अर्जाची छाननी करण्याचे काम पूर्ण झाले आहे. प्रस्तावधारकांना सादरीकरण करण्यास बोलविण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

---

**पुण्यातील बाणेर येथील गुन्हे प्रॉपर्टी सेलच्या पोलीस निरिक्षकाने २५ लाख रुपयांची मागणी केल्याबाबत**

**(४) ७५४८७ (२०-०४-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील बाणेर येथील जमिनीच्या वादात तडजोड करण्यासाठी गुन्हे प्रॉपर्टी सेलच्या पोलीस निरिक्षकाने आयुक्तांच्या नावे २५ लाख रुपये रक्कमेची मागणी केल्याची घटना माहे ऑगस्ट,२०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर पोलीस निरिक्षकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०३-२०१८) :** (१) पोलिस आयुक्तांचे नांवे रकमेची मागणी केलेली नाही. तथापि, याबाबत पोलिस आयुक्त, पुणे शहर यांना माहे ऑगस्ट, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात या विषयीचा अर्ज प्राप्त झालेला होता.

(२) त्याअनुषंगाने प्रॉपर्टी सेल,गुन्हे शाखेचे श्री.धनंजय जानबा धुमाळ,पोलिस निरीक्षक यांना दिनांक ११/८/२०१६ रोजी निलंबित करुन प्राथमिक चौकशी आदेशित केली तसेच विभागीय चौकशीत दोषारोप सिध्द झाल्याने त्यांना पोलिस निरीक्षक पदाच्या मूळ वेतनावर ठेवणे ही शिक्षा देण्याबाबत कारवाई करण्यात आली आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील घरकाम करणा-या मोलकरणींच्या समस्या सोडविणेबाबत**

**(५) ८६५३३ (०४-०९-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील घरकाम करणा-या मोलकरणींच्या विविध मागण्या आणि प्रलंबित प्रश्न तात्काळ सोडविण्यासाठी घरकामगार, मोलकरणी संघटनेने मुंबईतील कामगार आयुक्त कार्यालयावर माहे एप्रिल, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात मोर्चा काढून आंदोलन केलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी मोलकरणींनी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय, आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, तद्नुसार प्रतिकुल परिस्थितीत काम करणा-या मोलकरणींची स्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत असल्याने त्यांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात अद्यापपर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१५-०१-२०१८) :** (१) व (२) सदर प्रमाणे बाब निर्दशनास आलेली नाही.

(३) महाराष्ट्रातील घरेलु कामगारांना  सामाजिक सुरक्षा मिळण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ अधिनियम २००८ अन्वये राज्यात घरेलू कामगार कल्याण मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर मंडळांतर्गत घरेलू कामगारांना अंत्यविधी सहाय्य रु. २०००/-, प्रसूतीलाभ (२ अपत्यापर्यंत)रु. ५०००/-,तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत  घरेलू कामगार पदविका अभ्यासक्रम व घरेलू कामगारांना व त्यांच्या मुला-मुलींना  पदवी अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात येत आहे. या शिवाय घरेलू कामगारांसाठी CONVERGED आम आदमी विमा योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र भ्रष्टाचारात चौथ्या क्रमांकावर असल्याबाबत**

**(६) ८६८२२ (०४-०९-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेन्टर फॉर मीडिया स्टडीज च्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्र हे भ्रष्टाचारात चौथ्या क्रमांकाचे राज्य असल्याची माहिती माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान समोर आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने राज्यातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१८) :** (१) होय, 'सेंटर ऑफ मिडीया स्टडीज' यांनी केलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल वेबसाईट वरुन प्राप्त करुन त्यांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की, सेंटर ऑफ मिडीया स्टडीज यांना राज्यातील दोन जिल्हे निवड करुन त्यातील १५० घरातील लोकांना भ्रष्टाचाराबाबत प्रश्न विचारुन मिळालेल्या उत्तराचे आधारे त्यांनी महाराष्ट्र भ्रष्टाचारात चौथ्या क्रमांकावर आहे असा निष्कर्ष काढला आहे.

यावरुन संपूर्ण महाराष्ट्र राज्याबाबत अनुमान काढणे योग्य ठरणार नाही.

(२) व (३) भ्रष्टाचाराच्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालय/विभागात भ्रष्टाचार होणार नाही, यासाठी वेळोवेळी सुचना देण्यात आल्या आहेत. भ्रष्टाचाराच्या प्रकरणी लोकसेवकाचा सहभाग आढळल्यास भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नुसार कारवाई केली जाते याशिवाय लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत मोबाईल ॲप, टोल फ्री.क्रं. १०६४, ही हेल्पलाईन, ९९३०९९७७०० हा Whatsapp नंबर तसेच Facebook page प्रसिध्दकरून जन जागृती करण्यात येते. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या संकेतस्थळावरून

सामान्य जनतेसाठी सर्व माहिती उपलब्ध केली जात आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय कार्यालयात जावून भेटी देवून माहिती देत असतात व त्यांच्या कार्यक्षेत्रातील आठवडे बाजार, एसटी स्टॅण्ड, रेल्वेस्टेशन, कॉलेज इत्यादी ठिकाणी जाऊन सुध्दा जनजागृती करत असतात. तसेच शासकिय कार्यालयाच्या दर्शनी भागावर लाचलुचपत प्रतिबंधंक विभागाबाबत माहिती प्रसिध्द केली जाते.

---

## मुरूड (ता.मुरूड, जि.रायगड) येथील शासकीय आयटीआय इमारतीसाठी पोहोच रस्ता न बांधल्याबाबत

**(७) ८८१८९ (१२-०८-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड (ता.मुरूड, जि.रायगड) येथील शासकीय आयटीआय इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून कामाच्या निविदेतील अटी व शर्तीनुसार सदर इमारतीकडे जाणारा पोहोच रस्ता बांधण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोहोच रस्ता न बांधल्यामुळे विद्यार्थी व नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार निविदेतील अटी व शर्तीनुसार पोहोच रस्त्याचे बांधकाम न करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करण्याबाबत व सदर ठिकाणी पोहोच रस्त्याचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१५-०३-२०१८) :** (१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुरूड या संस्थेच्या प्रशासकीय व कार्यशाळा इमारतीचे बांधकाम अद्यापही पुर्ण झालेले नसुन, इमारतीकडे जाणारा पोहोच रस्ता बांधण्यात आलेला नाही. तथापि सदर संस्थेच्या प्रशासकीय व कार्यशाळा इमारतीच्या बांधकाम निविदेमध्ये इमारतीकडे जाणरा पोहोच रस्ता बांधण्याची तरतूद समाविष्ट नव्हती.

(२) इमारतीचे बांधकाम पुर्णत्वास गेले नसल्याने इमारतीचा ताबा घेतलेला नाही. त्यामुळे विद्यार्थी व नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३), (४) व (५) सदर इमारतीस पाहोच रस्ता बांधण्याची तरतूद इमारत बांधकामाच्या निविदेमध्ये नसल्याने चौकशी करण्याचा तसेच ठकेदारावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

संस्थेकरीता संपादीत केलेली जागा डोंगराळ असल्याने इमारतीकडे जाणेकरीताचा असलेला अंदाजे १५० मीटर लांबीचा व ४.५० मीटर रूंदीचा रस्ता बांधणे साठी रूपये ३२,६१,०६४/- इतक्या रक्कमेचे ढोबळ अंदाजपत्रकास व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने दिनांक २५/०६/२०१६ रोजी जिल्हा नियोजन समितीस सादर करण्यास मंजूरी

दिलेली असून जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, रायगड-अलिबाग यांच्या दिनांक ०४/११/२०१६ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती कार्यालय, रायगड-अलिबाग यांचेकडे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केला आहे. सद्यस्थितीत जिल्हा नियोजन समिती रायगड यांच्या स्तरावर सदर प्रस्ताव विचाराधीन आहे.

---

**आर.एस.आर.मोहता मिल हिंगणघाट (जि.वर्धा) या कारखान्यातील कामगारांच्या ग्रॅच्युइटीबाबत**

**(८) ८८४४८ (०४-०९-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर.एस.आर.मोहता मिल हिंगणघाट, (जि.वर्धा) या कारखान्यातील कपडा खाते बंद केले असून कामगारांच्या ग्रॅच्युइटीचा अंतिम हिशोब चुकीचा दिल्याने कामगारांवर झालेल्या अन्यायाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (हिंगणघाट) यांनी दिनांक १९ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.कामगार मंत्र्यांना निवेदनामार्फ़त बैठक घेऊन न्याय देण्याबाबत विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी बैठक घेऊन यावर निर्णय घेण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्यानुसार उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०१-०२-२०१८) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

सदर निवेदनाचे अनुषंगाने मा.मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२/०८/२०१७ रोजी मा.लोकप्रतिनिधी, कामगार संघटना व कंपनी व्यवस्थापन यांची संयुक्त बैठक संपन्न झाली. सदरहू बैठकीमध्ये दिलेल्या निदेशानुसार अपर कामगार आयुक्त, नागपूर यांच्या दालनात दिनांक ३१/१०/२०१७ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत अपर कामगार आयुक्त नागपूर यांनी सदर प्रकरणाच्या पडताळणीसाठी प्रभारी सहायक कामगार आयुक्त, भंडारा यांच्या नेतृत्वाखाली नियुक्त केलेल्या समितीने मे.मोहता मिलच्या आस्थापनेत दिनांक ०९/११/२०१७ रोजी भेट देऊन हिशोब तपासणीमधील काही सूचनांचे अनुषंगाने आवश्यक कार्यवाही त्वरीत करुन अहवाल सादर करण्याबाबत दिनांक २०/११/२०१७ अन्वये व्यवस्थापनास कळविण्यात आले होते. कार्यवाहीच्या अनुषंगाने व्यवस्थापनाकडून प्राप्त माहितीनुसार विव्हींग खात्यातील कपात केलेल्या २४५ कामगारांना कंपनीने दिलेली अंतिम रक्कम चुकीची असल्याने कामगार संघटनेने मा.उच्च न्यायालय,नागपूर येथे याचिका दाखल केलेल्या याचिकेसंदर्भात मा.न्यायालयाच्या निर्णयानंतर पुढील कार्यवाही करणे शक्य होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर येथे मादक अंमली पदार्थांचा व्यवसाय तेजीत असल्याबाबत**

**(९) ८८७२५ (०४-०९-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) रेल्वे स्थानकाजवळील संजय गांधीनगर, शांतीनगर, ब्राम्हणपाडा परिसर, विठ्ठल वाडी रेल्वे स्टेशन परिसर, गोपाल नगर, चोपडा कोर्टाच्या मागे, भीम कालनी, मराठा सेशन, मद्रासी पाडा, नेहरू चैक, साईबाबा मंदिराच्या मागे, हिललाईन पोलीस ठाण्याजवळ असलेले प्रेमनगर टेकरी, खेमानी इत्यादी भागात गर्द, चरस, गांजा, अफिम व हुक्का पार्लरचा व्यवसाय तेजीत चाललेला असून गर्दूल्ल्यांचा प्रमाण वाढल्याचे दिनांक २४ एप्रिल २०१७ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात २५ ते ३० हुक्का पार्लर असून सर्वाधिक हुक्कापार्लर हे गोलमैदान परिसरात आहेत असे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार उल्हासनगर शहारास नशेच्या विळाख्यातुन मुक्त करण्याकरिता पोलीस यंत्रणा व शासनास्तरावरून कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि ठाणे पोलीस आयुक्त परिसरातील परिमंडळ-४, उल्हासनगर हद्दीतील विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याचे हद्दीत दि. ०६.०६.२०१७ रोजी जुनी महाराष्ट्र बँकेच्या समोर नवीन किराणा शॉपच्या बाजूला, ओटी सेक्शन, उल्हासनगर ४ याठिकाणी पाईपच्या आधारे तंबाखू मिश्रीत वेगवेगळे फ्लेवर वापरून धुम्रपान करीत असतांना एकूण १३ इसमांवर तंबाखु व सिगरेट प्रतिबंधक अधिनियम २००३ कलम ४ प्रमाणे विठ्ठलवाडी पोलीस ठाणेत पोलीस एन. सी. नं. ४५/२०१७ ते ५७/२०१७ अन्वये कारवाई करण्यात आलेली आहेत.

तसेच मध्यवर्ती पोलीस ठाणे हद्दीत सन २०१७ मध्ये चोरून, लपून हुक्का पार्लरचा व्यवसाय चालू असल्याची माहिती काढून मिळालेल्या माहितीवरून वेगवेगळ्या ठिकाणी छापे मारून एकूण २७ इसमांवर तंबाखु व सिगरेट प्रतिबंधक अधिनयम २००३ कलम ४ प्रमाणे कारवाई करून सदरची ठिकाणे समूळ नष्ट करण्यात आलेली आहेत. तसेच मध्यवर्ती पोलीस स्टेशनच्या हद्दीतील १) हॉटेल डर्बी रेस्टॉरंट बार, २) प्रविण ईंटरनॅशनल हॉटेल, ३) काका का ढाबा, ४) गुरू द ढाबा, ५) बॉस सिटी ६) मेरा ढाबा अशा आस्थापनांवर खालील नमूद प्रमाणे कारवाई करण्यात येवून नमूद आस्थापनांना देण्यात आलेले परवाने रद्द करणेकामी उल्हासनगर महानगरपालिका, पोलीस आयुक्त ठाणे,सहाय्यक पोलीस आयुक्त, उल्हासनगर विभाग यांना अहवाल सादर केलेले आहेत त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेने हॉटेल डर्बी रेस्टॉरंट बार व काका का ढाबा चा अग्नीशमन ना हरकत दाखला रद्द केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) अंमली पदार्थांचे सेवन करणा-या तरूणांना वेळीच नशेतून बाहेर काढण्याकरिता महाविद्यालयीन स्तरावर "ड्रग्ज फ्री कॅम्पस" हा उपक्रम राबवून जनजागृती करण्यात येते. तसेच मुंबईतील १३ डी-ॲडाक्शन केंद्रामधून (हॉस्पीटल/एन.जी.ओ.) व्यसनाधीन इसमांवर/ मुलांवर उपचार करण्यात येतात. तसेच तसेच सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्री, दहिहंडी अशा उत्सवाच्या वेळी अंमली पदार्थ विरोधी कक्षाच्या वतीने जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच २६ जून हा अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त २६ जून ते १ जुलै असा पंधरवडा साजरा करण्यात येतो. सदर पंधरवडयादरम्यान पुढील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले. अंमली पदार्थ व त्यांचे दुष्परिणाम याबाबत विद्यार्थांना माहिती देणे, फिल्म दाखविणे, माहिती, चर्चासत्र, हॅन्डबील वाटप व भिंती पोस्टर्सचे प्रदर्शन करणे. तसेच प्रचार फेऱ्या, मॅरेथॉन, मोहल्ला कमिटी, पब्लीक मिटींग असे कार्यक्रम घेण्यात येतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयात राबविण्यात आलेल्या वाहन तपासणी मोहिमेमध्ये पोलिसांनी वाहनधारकांना त्रास दिल्याबाबत

**(१०) ८८७६७ (०४-०९-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयात माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान राबविण्यात आलेल्या वाहन तपासणी मोहिमेमध्ये वाहनधारकांवर पोलिस दादागिरी करीत असल्याच्या अनेक तक्रारी आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच कोल्हापूर येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात वाहनधारकांसह नागरिकांना पायाभूत सुविधांचा अभाव तसेच ऑनलाईनमुळे अनेक कामांचा खोळंबा होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दादागिरी करणा-या पोलिसांवर कारवाईबाबत व सदर प्रादेशिक परिवहन कार्यालयात पायाभूत सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) राष्ट्रीय सूचना केंद्र यांच्यामार्फत सारथी ४.० व वाहन ४.० संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना घर बसल्या अर्ज करणे शक्य झाले आहे. सदर प्रणाली कार्यान्वित झाल्यानंतर प्राथमिक कार्यान्वयाच्या अडचणी वगळता, सध्यस्थितीत कामकाजात कोणतीही अडचण नसून, कामामध्ये अवाजवी विलंब झाल्याची कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

अर्जदार इंटरनेटच्या सहाय्याने अर्ज दाखल करण्यास असमर्थ असल्यास अशा अर्जदारांसाठी शुल्क आकारुन नागरी सुविधा केंद्र अर्ज करण्याची जनतेस सुविधा उपलब्ध करुन देते.

कोल्हापूर जिल्ह्यात २७९ नागरी सुविध केंद्र कार्यान्वित आहेत. सारथी ४.० यंत्रणेद्वारे सरासरी दरमहा ५००० ते ५५०० अर्ज व वाहन ४.० यंत्रणेद्वारे ४००० ते ४५०० अर्ज हाताळले जातात. सद्यस्थितीत सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत.

(५) विलंब झालेला नाही.

---

### दिग्रस तालुक्यात शंभर रुपयांच्या झेरॉक्स नोटा चलनात आढळल्याबाबत

**(११) ८९२९१ (०४-०९-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिग्रस तालुक्यात (जि.यवतमाळ) माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शंभर रुपयांच्या झेरॉक्स नोटा चलनात आढळल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) दिग्रस तालुक्यातील पेट्रोलपंप तसेच इतर बाजारपेठेच्या ठिकाणी अज्ञात व्यक्तीकडुन सदर नोटा चलनात आणण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

दिग्रस तालुक्यात माहे मे, २०१७ मध्ये शंभर रुपयाच्या झेरॉक्स नोटा चलनात आढळल्या संदर्भात कोणताही गुन्हा नोंद नाही.

(२) हे खरे नाही.

दिग्रस तालुक्यातील पेट्रोलपंप तसेच इतर बाजारपेठेच्या ठिकाणी अज्ञात व्यक्तीकडून सदर नोटा चलनात आणण्यासंदर्भात कोणताही गुन्हा नोंद नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर शहरातील मेडिकल परिसरातील विद्यार्थिनींच्या वसतिगृहासमोरील दुचाकींना अज्ञात इसमाने पेटवून दिल्याबाबत

**(१२) ८९३२७ (०४-०९-२०१७). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील मेडिकल परिसरातील विद्यार्थिनींच्या वसतिगृह क्र.२ समोर उभ्या असलेल्या दोन दुचाकींना एका अज्ञात इसमाने पेटवून दिल्याची घटना माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील १० महिन्यांतील तिसरी घटना असून येथील विद्यार्थिनींमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) नागपूर शहर पोलीस आयुक्तालया अंतर्गत पोलीस स्टेशन अजनी येथे माहे एप्रिल २०१७ मध्ये अपराध क्र.१११/१७ कलम ४३५, ४४८, ४२७ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

तसेच यापुर्वी पोलीस स्टेशन अजनी येथे माहे जुन २०१६ मध्ये अपराध क्र.१७१/१६ कलम ४३५ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तथापि, विद्यार्थीनीमध्ये भीतीचे वातावरण पसरलेले नाही.

(३) व (४) चौकशी करण्यात आली असून चौकशीत दि.१३/४/२०१७ रोजी दोन गाड्या पार्कींगमध्ये ठेवल्या असता गाड्यांवर ज्वलनशिल पदार्थ शिंपडून आग लावली. सदर प्रकरणी गाड्यांचे नुकसान केल्यावरुन पोलीस स्टेशन अजनी अपराध क्र.१११/१७ कलम ४३५, ४४८, ४२७ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. यासंदर्भात सीसीटीव्ही फूटेजच्या आधारे ३ आरोपींचा पीसीआर घेण्यात आल्यावर त्यांनी गुन्हा केला असल्याचा कबुली जबाब दिला आहे. सदर गुन्ह्याबाबत दोषारोपपत्र मा.न्यायालयात सादर केला आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. अपराध क्र.१७१/१६ संदर्भातील गुन्ह्यात "अ" फायनल सादर करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वैशाली नगर मधील (कांदिवली, मुंबई) रामेश्वर प्रतिष्ठानच्या मंदिरामागे होणारे गैरप्रकार थांबविण्याबाबत

**(१३) ८९५०२ (०४-०९-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैशाली नगर मधील (कांदिवली, मुंबई) रामेश्वर प्रतिष्ठानच्या मंदिरामागे होणारे गैरप्रकार थांबविण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा. अप्पर आयुक्त, कांदिवली पोलिस ठाणे, कांदिवली यांना वारंवार निवेदन देऊनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच, कार्यवाही केली असल्यास, त्यांचे स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) :** (१) सदर प्रकरणी अप्पर आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई व कांदिवली पोलिस ठाणे, कांदिवली यांना लोकप्रतिनिधींकडुन कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) वैशालीनगर, रामेश्वर प्रतिष्ठान मंदिर हे कांदिवली येथे नसुन दहिसर पुर्व येथे आहे. सदर मंदिरामागे होणारे गैरप्रकाराबाबत दहिसर पोलीस ठाणे येथे देखील कोणताही अर्ज प्राप्त झालेला नाही.

परंतु, दहिसर पोलीस ठाणे हद्दीत गस्तीदरम्यान वैशालीनगर मधील रामेश्वर प्रतिष्ठान मंदिराच्या परिसरात गैरप्रकार करताना ३ इसम आढळुन आल्याने त्यांच्यावर म.पो.का. कलम ११० अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे. या कारवाईनंतर अद्यापपर्यंत कोणताही गैरप्रकार पुन्हा आढळुन आलेला नाही. तसेच, सदर परिसरात मोबाईल २, बिट मार्शल २, निगराणी पथक व गुन्हे प्रकटीकरण पथकामार्फत गस्त करण्यात येत आहे.

---

## समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराजांवर झालेल्या प्राणघातक हल्ला

**(१४) ९०४८८ (०४-०९-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रसिध्द सप्तखंजिरी वादक, समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराज चिंचोळकर यांचेवर दिनांक १६ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास मुंबई येथे प्राणघातक हल्ला करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४ ते २०१७ या कालावधीत पुरोगामी विचारसरणीच्या सामाजिक कार्यकर्त्यांवर होणा-या हल्ल्यात वाढ झाल्याची चिंताजनक बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त हल्ल्याप्रकरणी सखोल चौकशी करून सर्व गुन्हेगारांना अटक करावी या मागणीसाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मे, २०१७ रोजी अमरावती येथे अन्नत्याग आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त हल्ल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१४ ते २०१७ या कालावधीत कोल्हापुरमध्ये २ गुन्हे व मुंबई मध्ये १ गुन्हा घडल्याची नोंद आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असुन सत्यपाल महाराज चिंचोळकर यांचेवर झालेल्या हल्ल्याबाबत भोईवाडा पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ९८/२०१७, भा.दं.वि. कलम ३२४ अन्वये एका आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्यातील आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्रातील तंबाखुजन्य उत्पादन करणा-या कंपन्यामध्ये काम करीत असलेल्या कर्मचा-यांच्या आरोग्याबाबत**

**(१५) ९१३३८ (०४-०९-२०१७). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात तंबाखुजन्य उत्पादन करणा-या अनेक कंपन्यांमध्ये मोठ्या संख्येने कर्मचारी काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास अंमळनेर (जि.जळगाव) विधानसभा क्षेत्रातील तंबाखुजन्य उत्पादन करणा-या कंपन्यांमध्येही मोठ्या संख्येने कर्मचारी काम करीत असून त्यांची कंपनीधारकांकडून पिळवणूक होत असून त्यांना कोणत्याही सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तंबाखुजन्य उत्पादन करणा-या कंपन्यामधील अनेक कर्मचा-यांना मोठ्या आजारामुळे आपला जिव गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या तंबाखुजन्य उत्पादन करणा-या कंपन्यामधील काम करणा-या कर्मचा-यांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून शासनाने त्यांच्यासाठी विमा, मेडीक्लेम, भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन व कामगारांना देण्यात येणा-या सेवा व शर्ती अंमलात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०८-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही, अमळनेर जि.जळगाव विधानसभा क्षेत्रात आर.के.पटेल ॲण्ड कंपनी टोबॅको प्रोसेसर्स, धुळे रोड, ता.अमळनेर, जि.जळगाव हा तंबाखु तयार करणारा उद्योग कार्यरत असुन त्यामध्ये १२२ कामगार काम करतात. सदर कारखान्यातील कामगारांचे नेतृत्व भारतीय मजदूर संघ ही मान्यता प्राप्त संघटना करते. व्यवस्थापन व मान्यता प्राप्त संघटना यांचेत कामगारांची सुविधा, सेवाशर्तीबाबत करार झालेला असुन त्यानुसार सर्व सुविधा कामगारांना उपलब्ध करून दिल्या जात आहेत. कंपनीधारकांकडून पिळवणूक होत असल्याची तक्रार कामगार / संघटनांकडून प्राप्त झालेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) अमळनेर तालुक्यातील आर.के.पटेल कारखान्यातील कामगारांना करारानुसार भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन  तसेच इतर सुविधा दिल्या जातात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नेवासा तालुक्यातील (जि.अहमदनगर) कुकाणा पोलिस चौकीच्या व्यवस्थेबाबत

**(१६) ९२२४४ (०४-०९-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा तालुक्यातील (जि.अहमदनगर) कुकाणा पोलिस चौकीला स्वः मालकीची जागा असूनही आठ बाय सहाच्या दोन खोल्यांमध्ये ही चौकी असून या ठिकाणी शौचालयाची व्यवस्था नसणे, फोन नसणे, चार चाकी गाडी नसणे तसेच केवळ सात पोलिस कर्मचारी ४० गावांचा कारभार पाहत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०१८) :** (१), (२) व (३) नेवासा पोलीस स्टेशन अंतर्गत कुकाणा दूरक्षेत्र कार्यालयाकरीता आवश्यक असणाऱ्या सर्व सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याबाबत पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुळशी (ता.जि.पुणे) येथे चो-यांचे प्रमाण वाढल्याबाबत

**(१७) ९२५४८ (०४-०९-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळशी (ता.जि.पुणे) येथे मागील अनेक महिन्यांपासून चो-यांचे सत्र सुरुच असल्याचे माहे जुन, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुळशी तालुक्यात चो-यांचे सत्र दरवर्षी वाढत असुन या चो-यांचे तपास होत नुसन जर तपासच होणार नसेल तर फिर्याद करुन उपयोग काय अशी भावना सर्वसामांन्य नागरिकांची झाली असल्याने या चो-यांचे तपास त्वरीत करुन नागरिकांची सुरक्षा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मुळशी (ता.जि.पुणे) येथे सन २०१६-१७ मध्ये खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे गुन्ह्याची स्थिती दर्शविण्यात येत आहे.

| सन २०१६ | | | | सन २०१७ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | गुन्ह्याचा प्रकार | घडलेल्या गुन्ह्यांची संख्या | उघड गुन्ह्यांची संख्या | गुन्ह्याचा प्रकार | घडलेल्या गुन्ह्यांची संख्या | उघड गुन्ह्यांची संख्या |
| १ | दरोडा | ०० | ०० | दरोडा | ०१ | ०१ |
| २ | जबरी चोरी | ०० | ०० | जबरी चोरी | ०२ | ०१ |
| ३ | घरफोडी | ११ | ०६ | घरफोडी | १४ | ०२ |
| ४ | इतर चोरी | ४९ | १२ | इतर चोरी | ४० | ११ |
| | एकूण | ६० | १८ | एकूण | ५७ | १५ |

उपरोक्त नमूद आकडेवारी पहाता सन २०१६ च्या तुलनेत सन २०१७ मधील गुन्ह्यांत ३ ने घट झाली आहे.

(२) मालमत्ते विरुध्द घडणाऱ्या गुन्हयांमध्ये डॉग युनिट व फिंगरप्रिंट युनिटचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच गुन्ह्यांना प्रतिबंध करणे व जास्तीत जास्त गुन्हे उघडकीस आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. जामीनावर सुटलेल्या गुन्हेगारांवर नजर ठेवण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माणगांव तालुक्यामध्ये विकसित होणा-या विळे भागाड औद्योगिक वसाहतीत वाहतुकदारांची आर्थिक फसवणुक होत असल्याबाबत

**(१८) ९३६६१ (०४-०९-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगांव तालुक्यामध्ये (जि.रायगड) वेगाने विकसित होणा-या विळे भागाड औद्योगिक वसाहतीत कच्या मालाचा पुरवठा करणा-या व पक्क्या मालाची वाहतूक करणाऱ्या वाहतुकदारांकडून विळे भागाड प्रकल्पग्रस्त चालक, मालक, वाहक वाहतूक सेवा संस्था या संघटनेच्या नावाखाली वाहतुकदारांची आर्थिक फसवणुक होत असल्याचे नुकतेच माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उक्त प्रकरणी दोषी असणा-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१८) :** (१) हे खरे आहे,

(२) व (३) माणगांव पोलीस ठाणे येथे गु. र. नं.९१/२०१७, भा.द.वि. सं.कलम ३८५, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील उत्राव रावते व त्यांच्या मुलाला नाहक मारहाण करून त्यांच्याविरूध्द खोटे गुन्हे दाखल केल्याबाबत**

**(१९) ९३७७१ (०४-०९-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील संजोग बिछायत केंद्राचे संचालक उत्राव रावते व त्यांच्या मुलाला नाहक मारहाण करून त्यांच्याविरूध्द खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या उमरखेड (जि.यवतमाळ) पोलिसांविरूध्द कडक कारवाई करण्याचे निवेदन जिल्हा पोलिस अधिक्षकांना माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिकांनी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबधित पोलिसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

उमरखेड, जिल्हा यवतमाळ येथील अर्जदार श्री.गणेश दत्तराव रावते यांनी त्यांचे वडील श्री.दत्तराव रावते व त्यांना उमरखेड पोलीस स्टेशन येथील पोलीसांनी विनाकारण मारहाण करुन खोटे गुन्हे दाखल केल्याबाबत तक्रार अर्ज दि.६/६/२०१७ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय, यतवमाळ येथे दिला आहे.

(२) व (३) सदर तक्रार अर्जाची चौकशी सहायक पोलीस अधीक्षक, उपविभाग पुसद यांचेकडून करण्यात आली आहे. त्याप्रमाणे दि.३/६/२०१७ रोजी रात्री उमरखेड शहर येथे मुस्लीम समाजातील दोन गटात तेढ निर्माण झाल्याने पोलीस घटनास्थळी पोहचले. या ठिकाणी श्री.दत्तराव रावते व त्यांचा मुलगा गणेश दत्तराव रावते यांनी पोलीस कर्मचाऱ्यांसोबत धक्काबुक्की करुन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने त्यांचे विरुध्द गु.र.क्र.२७७/१७ कलम ३५३, २९४, ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंदवून दोघांनाही त्याच दिवशी सोडण्यात आले.

तक्रारदार यांना पोलीसांनी मारहाण केल्याबाबत तक्रारदार यांनी कोणतेही पुरावे सादर केले नाही. त्यांचे विरुध्द खोटा गुन्हा दाखल केल्याचे चौकशीत आढळुन आले नाही. सदर प्रकरणी पोलीसांनी योग्य कारवाई केली असून त्यांचा कोणताही दोष असल्याचे दिसून न आल्याने पोलीसांविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महागांव तालुक्यात (जि.यवतमाळ) वरळी मटका चालत असून वडद व पुसद मार्गावरील शेतातील बंगल्यात त्याचे मुख्यालय असल्याबाबत**

**(२०) ९३८१० (०४-०९-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव तालुक्यात (जि.यवतमाळ) वरळी मटका चालत असून वडद व पुसद मार्गावरील शेतातील बंगल्यात त्याचे मुख्यालय असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) महागांव पोलीसांनी लपून छपून चालणाऱ्या अवैध धंद्यावर छापे टाकून वेळोवेळी कारवाई केली आहे.

महागांव पोलीसांनी त्यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे सन २०१४ ते सन २०१७ मध्ये खालीलप्रमाणे कारवाई केली आहे.

| | | मुंबई जुगार कायद्यान्वये नोंद केसेस | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वर्ष | केसेस | आरोपी संख्या | जप्तमाल किंमत |
| १ | २०१४ | ८० | १६० | ५,२३,२२५ |
| २ | २०१५ | ४४ | ५५ | ३,३४,२७० |
| ३ | २०१६ | ५८ | १३४ | ३,८१,४६५ |
| ४ | २०१७ | ७३ | १६७ | ५,००,१२६ |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माणगाव तालुक्यातील (जि.रायगड) औद्योगिक क्षेत्रात झपाट्याने वाढत असलेल्या विळे-भागाड औद्योगिक वसाहतीत स्वतंत्र पोलीस ठाण्याची इमारत नसल्याबाबत**

**(२१) ९३८६६ (०४-०९-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगाव तालुक्यातील (जि.रायगड) औद्योगिक क्षेत्रात झपाट्याने वाढत असलेल्या विळे-भागाड औद्योगिक वसाहतीत अद्यापही स्वतंत्र पोलीस ठाण्याची इमारत उभारली नसल्याचे नुकतेच माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात पोलिस ठाण्याची इमारत नसल्याने या भागातील गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असुन येथील औद्योगिक क्षेत्रातील सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त ठिकाणी स्वतंत्र पोलिस ठाण्याची इमारत उभारण्याबाबत परिसरातील नागरिकांनी अनेक वर्षापासून मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त ठिकाणी स्वतंत्र पोलिस ठाण्याची इमारत उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०१८) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) सद्य:स्थितीत स्वतंत्र पोलीस ठाणे मंजूर नाही. सदर ठिकाणी स्वतंत्र पोलीस ठाणे मंजूर झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

**राज्यातील होमगार्डच्या समस्यांबाबत**

**(२२) ९४९४३ (१३-१०-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरात सुमारे ४० हजार होमगार्ड्स असून राज्यातील गणेशोत्सव, दिवाळी, ईद तसेच इतर सण उत्सवाचे वेळी होमगार्ड्सना कामावर बोलविले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गतवर्षी गणेशोत्सवाच्या बंदोबस्तासाठी केलेल्या कामाचे पैसे १५ ऑगस्ट २०१७ रोजी पर्यंत मिळाले नसल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, होमगार्डच्या विविध मागण्यांसाठी त्यांनी आझाद मैदान मुंबई येथे नुकतेच धरणे आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील होमगार्ड्स यांच्या समस्या सोडविणेसाठी शासनाने कोणती उपाययोजनात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०१८) :** (१) होय.
(२) हे खरे नाही, तथापि, देय भत्त्यांचे प्रदान विलंबाने होत असल्याची बाब श्री. विकास हरियाण यांनी दिनांक २९.९.२०१७ अन्वये निदर्शनास आणून दिली आहे. त्याअनुषंगाने केलेल्या पडताळणीत समादेशक, होमगार्ड,बृहन्मुंबई यांच्या अधिनस्त सायन, बांद्रा, मालाड, कांदिवली, जुहू, गोरेगाव, भायखळा व वर्सोवा पोलीस स्टेशनकडून कर्तव्य प्रमाणपत्रे मागणी करुनही प्राप्त न झाल्याने भत्त्यांचे प्रदान दिनांक १५.८.२०१७ पर्यंत करण्यात आले आहे. उर्वरित बृहन्मुंबई अधिनस्त अन्य सर्व पोलीस स्टेशन तसेच सर्व महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील होमगार्डना गणेशोत्सव बंदोबस्त कर्तव्य २०१६ बाबतचे मानधन वेळीच अदा करण्यात आले आहे.

(३), (४) व (५) होय, तथापि, यापूर्वी शासन निर्णय दि.१३.७.२०१० अन्वये होमगार्ड संघटनेमध्ये १२ वर्षे किंवा १२ वर्षापेक्षा जास्त काळ सदस्यत्व असलेल्या होमगार्ड सदस्यांची सेवा समाप्त करणे व पुर्ननियुक्तीच्या जाचक अटी याबाबतच्या शासन निर्णयास स्थगिती देण्याबाबत विविध लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदय यांना विनंती केली होती. त्या अनुषंगाने शासन पत्र क्र. एचजीएस-२०१६/प्र.क्र.१८४/विशा-८,दि.१०.७.२०१७, दिनांक ९.८.२०१७ व दि. १२.९.२०१७ अन्वये होमगार्ड संघटनेमध्ये १२ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झाला म्हणून ज्या होमगार्ड स्वयंसेवकांचे होमगार्ड संघटनेचे सदस्यत्व रद्द केलेले आहे, अशा सर्व होमगार्ड स्वयंसेवकांना होमगार्ड संघटनेचे सदस्य करुन घेण्याबाबत महासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविले आहे.

---

**सातारा जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून खंडणी मागणा-यांना गुन्हे अन्वेषण विभागाने अटक केल्याबाबत**

**(२३) ९४९८६ (१३-१०-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणंद. तरडगाव (ता.फलटण, जि.सातारा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ.अनिल कदम यांचेकडून खंडणी मागणारे पशुवैद्यकीय डॉ.प्रविण कदम व डॉ.नितीन टेळे (रा.गलांडवाडी, ता.दौंड, जि.पुणे) यांना सातारा गुन्हे अन्वेषण विभागाने अटक केले असून या प्रकरणी लोणंद पोलीस ठाण्यामध्ये खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे दिनांक ०९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली काय आहे,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०१७) :** (१) हे खरे आहे,

(२) व (३) अनिल तुकाराम कदम, वैद्यकीय अधिकारी, यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन डॉ.प्रविण शिवाजी कदम, व डॉ.नितीन सर्जेराव टेळे यांनी खंडणीची मागणी केल्याच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन लोणंद येथे गु.र.नं. २४१/२०१७ भा.द.वि.सं. कलम ३८४,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींची चार दिवस पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आली होती. सध्या ते जामीनावर सुटले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मुख्य माहिती आयुक्तांचे पद रिक्त असल्याबाबत**

**(२४) ९५१८८ (०३-०१-२०१८). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुख्य माहिती आयुक्तांचे पद मागिल सहा महिन्यापासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिणामी अन्य खंडपीठाचाही कारभार पूर्णपणे ठप्प असून विविध खंडपीठाकडे प्रलंबित द्वितीय अपिलांची संख्या एकूण ३९ हजाराच्या वर पोहचली आहे,
हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य माहिती आयुक्तांचे पद रिक्त असल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्यशासनाने उक्त प्रश्नांची दखल घेऊन मुख्य माहिती आयुक्त पदावर लवकरात लवकर नियुक्ती करुन माहितीच्या अधिकारा अंतर्गत प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०१८) :** (१) होय.

(२) नाही, राज्यातील केवळ राज्य मुख्य माहिती आयुक्ताचे पद रिक्त आहे.

सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार मा.राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे.

अन्य सर्व खंडपीठांवर राज्य माहिती आयुक्त कार्यरत असून तेथील कामकाज सुरू आहे.

तथापि, माहिती अधिकाराबाबत जनमानसातील जागरूकता वाढत असून आयोगाकडे येणाऱ्या द्वितीय अपिल प्रकरणांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे.

त्यामुळे माहे ऑक्टोबर २०१७ अखेरीस राज्य माहिती आयोगाकडील प्रलंबीत द्वितीय अपिल प्रकरणांची संख्या ३८५७९ इतकी आहे.

(३), (४) व (५) श्री.रत्नाकर गायकवाड , तत्कालीन मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या दि.२९.५.२०१७ रोजी झालेल्या निवृत्तीमुळे सदर पद रिक्त आहे.

राज्य मुख्य माहिती आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार मा.राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे.

राज्य मुख्य माहिती आयुक्ताचे रिक्त पद भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

---

**कळवा (जि.ठाणे) येथील सायबा फॅमिली रेस्टॉरंटमध्ये कळवा पोलीस स्टेशनमधील पोलिस हवालदार व त्याच्या साथीदारांनी हॉटेल कर्मचाऱ्याना केलेली मारहाण**

**(२५) ९५१९४ (०६-०१-२०१८). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि.ठाणे) येथील सायबा फॅमिली रेस्टॉरंटमध्ये कळवा पोलीस स्टेशनमधील पोलिस हवालदार व त्याच्या ५ साथीदारांनी मनसोक्त दारु पिल्यानंतर दारुचे बील मागितल्याने हॉटेल कर्मचाऱ्यांना जबर मारहाण केल्याची घटना दिनांक २६ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) होय. या घटनेबाबत सायबा हॉटेलचे मालक यांनी तक्रारी अर्ज केला आहे. सदर अर्जाची चौकशी केली असुन त्यानुसार, सदर घटनेमध्ये पोहवा/५८२८, प्रविण संखे यांनी हॉटेल कर्मचारी यास जेवणाचे बिलाचे कारणावरुन मारहाण केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचेविरुध्द कळवा पोलीस स्टेशन येथे अदखलपात्र गुन्हा रजि. क्र. १९८०/२०१७, भा. दं. वि. कलम ३२३ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. तसेच त्यांचे वर्तन पोलीस खात्यास अशोभनीय, बेशिस्त व बेजबाबदारपणे केल्याचे दिसुन आल्याने त्यांना दि. ४.९.२०१७ रोजी निलंबित करण्यात आले असुन त्यांचेसह ७ पोलीस साथीदारांवर खातेनिहाय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई मालवणी येथे पोलीस असल्याची बतावणी करुन व्यापाऱ्याच्या कर्मचाऱ्याने ३० लाख रुपयाचे अपहरण केल्याबाबत**

**(२६) ९५२११ (०६-०१-२०१८). श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मालवणी येथे पोलीस असल्याची बतावणी करुन एका व्यापाऱ्याच्या कर्मचाऱ्याने भर रस्त्यात कामगारांचे रुपये ३० लाख पळवून नेल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार रुपये ३० लाख पळवून नेलेल्या व्यापाऱ्याच्या कर्मचाऱ्याचा शोध घेवून सदर कर्मचाऱ्याकडुन अपहारीत रक्कम वसूल करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सदर प्रकरणी मालवणी पोलीस स्टेशन, मुंबई येथील माहे ऑक्टोबर, २०१७ वा त्यादरम्यानचा उपलब्ध अभिलेख तपासला असता अशा प्रकारची कोणतीही घटना घडल्याची नोंद नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी केलेल्या संपाबाबत**

**(२७) ९५२२० (०२-०१-२०१८). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य शासनाच्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत माहे ऑगस्ट-सप्टेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान संप केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या मागण्या कोणत्या आहेत,
(३) असल्यास, सदरहू मागण्यापैंकी कोणकोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या तसेच उर्वरित मागण्यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) कर्मचा-यांच्या प्रमुख मागण्या खालील प्रमाणे आहेत. १ अनुकंपा तत्वावरील सेवाभरती विनाअट करावी. २ वैद्यकीय दृष्टया अपात्र असलेल्या कर्मचा-याच्या पाल्यास शासकीय सेवेमध्ये सामावून घ्यावे. ३ चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्ग सेवानिवृत्त झाल्यावर त्यांच्या एका

पाल्यास शासन सेवेत सामावून घ्यावे. ४ सर्व खात्यातील चतुर्थश्रेणी कर्मचा-यांची रिक्त पदे ४ थी ते ९वी पास मधून तात्काळ भरती करावी. ५ सर्व चतुर्थश्रेणी कर्मचा-यांना शासकीय वसाहत गृह खात्याप्रमाणे बांधून मिळावेत. ६ चतुर्थश्रेणीमधून तृतीयश्रेणीमध्ये २५ टक्के ऐवजी ५० टक्के पदोन्नती करताना चतुर्थश्रेणीची पदे निरसित करु नयेत. ७ दि.६.६.२०१७ रोजी महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ, आणि एक-ल यामध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश या व्यतिरिक्त) नियम व आदेश रद्द करण्यात यावेत. ८ सातवा वेतन आयोग फरकासह तात्काळ मंजूर करावा. ९ सन २००५ पासून जे चतुर्थश्रेणी कर्मचारी अंशदायी पेन्शन योजना रद्द करुन जुन्या पध्दतीने चालू करावी. १० कृषी विभागामध्ये आकृतीबंध पदे निर्माण करताना १९९८ प्रमाणे वाहन चालक व चतुर्थश्रेणी यांची पदे निर्माण करावी. ११ महसूल विभागातील हवालदार, नाईक, दप्तरी पदाचे मूळ वेतन लिपिकाप्रमाणे लागू करण्यात यावे व शैक्षणिक अर्हतेनुसार तलाठी या पदावर पदोन्नती देण्यात यावी. १२ शासकीय वसाहतीमध्ये राहणारे सेवानिृत्त कर्मचारी व अनुकंपा तत्वावरील राहणारे कुटुंब यांना तीन महिन्याऐवजी बारा महिने राहण्याचा कालावधी वाढवून देण्यात यावा. १३ वर्ग- ड कर्मचा-यांचे खाजगीकरण करु नये. १४ जे कर्मचारी ठेका पद्धतीने वर्षानुवर्षे काम करीत आहेत त्यांना शासन सेवेत सामावून घ्यावे व हया पुढील ठेकेदारी पद्धत रद्द करावी.

(३) गट विमा योजनेच्या मासिक हप्त्याची रक्कम ₹ ६० इतकी वाढविण्याची मागणी होती, त्यानुषंगाने दि.३०.१.२०१६ च्या शासन निर्णयान्वये ती ₹ २४० करण्यात आली आहे. चतुर्थश्रेणी गट-ड च्या पदावरुन गट-क च्या पदावर पदोन्नती व सरळसेवा हे प्रमाण ५०% : ५० % असे करण्याची मागणी होती. त्याअनुषंगाने दि.१४.१.२०१६ च्या शासन निर्णयानुसार गुणोत्तर प्रमाणात सुधारणा करण्यात आली आहे. तसेच संघटनेच्या मागण्यांसंदर्भात चर्चा करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे बैठक आयोजित करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक येथे एका हॉटेलमध्ये बेवारस स्थितीत पैशाने भरलेली बॅग आढळून आल्याबाबत

**(२८) ९५३७३ (०६-०१-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील गंगापुर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिनांक २ जुलै २०१७ रोजी वा त्यासुमारास एका हॉटेलमध्ये बेवारस स्थितीत पैशाने भरलेली बॅग आढळून आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची बॅग ही चंद्रपुर जिल्हयातील एका महसुल अधिका-याची असल्याची माहिती निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त घटनेची पोलीस दप्तरी नोंद न घेता सदर प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०२-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) तहसिलदार जिवती हे दि. ०१/०७/२०१७ रोजी त्यांच्या पत्निसोबत ब्लु लिफ हॉटेल, गंगापुर रोड, नाशिक येथे जेवणासाठी गेले होते, तेथे त्यांची काळ्या रंगाची लॅपटॉप बॅग, त्यात महत्वाची कागदपत्रे व २०,०००/- रु. रोख व इतर चिज वस्तु असलेली बॅग अनावधानाने हॉटेलमध्ये राहुन गेली.

सदर बॅग हॉटेल मॅनेजर यांनी तहसिलदार जिवती यांना परत केली आहे. सदर प्रकार हा नजरचुकीने व अनावधानाने घडला व सदर बॅग परत मिळाल्यामुळे सदरबाबत पोलीसांत तक्रार दिली नाही. याबाबत दि.०६/०७/२०१७ रोजी गंगापूर पोलीस स्टेशन, स्टेशन डायरी नोंद क्र. २४/२०१७ घेण्यात आली आहे.
(६) विलंब झालेला नाही.

---

### राज्यातील थोर व्यक्तींच्या स्मारकांचे काम अनेक वर्षापासून रखडलेले असल्याबाबत

**(२९) ९५५२५ (०३-०१-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांचे आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्मारक त्यांच्या पेण तालुक्यातील गोगादे बुद्रुक जन्मभूमीत उभारण्याचा निर्णय शासनाने सन १९९२ मध्ये घेतला असून स्मारक उभारण्याच्या दृष्टीने अद्यापपर्यंत कोणत्या प्रकारची कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, मराठवाड्यातील विख्यात विचारवंत नरहर कुरुंदकर यांच्यासह राज्यातील ११ थोर व्यक्तींच्या स्मारकांचे कामे गेल्या सात ते आठ वर्षापासून रखडलेले आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त थोर व्यक्तींच्या स्मारकांचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०३-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

आचार्य विनोबा भावे यांचे स्मारक त्यांच्या जन्मभूमीत पेण तालुक्यातील गागोदे बुद्रुक येथे उभारण्यासाठी दिनांक १२ मार्च,१९९८ अन्वये रु.७४.७० लाख इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून दिनांक ३१ मार्च,२००५ अन्वये रु.१०,५९,८४३/- एवढी रक्कम वितरित करण्यात आली आहे. या निधीमधून तलावाचे सुशोभिकरणाचे काम पूर्ण

करण्यास आले असून सद्यस्थितीत स्मारकाच्या प्रस्तावित जागेचे नव्याने सर्वेक्षण करुन वास्तुशास्त्रीय आराखडा तयार करुन नव्याने अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे.

(२), (३) व (४) सांगली येथील माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या स्मारकाचे ९५ टक्के सिव्हील वर्क तसेच विदयुतीकरणाचे ७५ टक्के काम पूर्ण झाले आहे. विख्यात विचारवंत नरहर कुरुंदकर यांच्या स्मारकाचे काम प्रगतीपथावर असून मार्च २०१८ अखेरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. अन्य स्मारकांची कामे न्यायालयीन प्रकरण, जागेची अनुपलब्धता, वास्तुविशारदांनी वेळोवळी सुचविलेले बदल, निविदा प्रक्रिया यासारख्या काही तांत्रिक अडचणींमुळे अपूर्ण असून सदर अडचणी दूर करुन स्मारकांची कामे नजिकच्या कालावधीत पूर्ण करण्याचे प्रयोजन आहे.

---

**मुरबाड तालुका (जि.ठाणे) दिवाणी न्यायालयीन इमारत जुनी व जीर्ण झाल्याबाबत**

**(३०) ९५७२४ (०६-०१-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड तालुका (जि.ठाणे) दिवाणी न्यायालयीन इमारत १०० वर्षापूर्वीची जुनी व जीर्ण झालेली असून नवीन इमारत बांधकाम प्रस्ताव शासनाकडे गत तीन वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार मुरबाड तालुका दिवाणी न्यायालयीन नवीन इमारत बांधकामाबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) चौकशीचा प्रश्न उदभवत नसल्याने, निष्कर्ष निरंक आहेत. परंतु मुरबाड, तालुका (जि.ठाणे) येथे दिवाणी न्यायालयाकरीता नवीन इमारत बांधण्यासाठी जागा उपलब्ध केली आहे किंवा कसे याबाबत जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे यांनी दिनांक २८/७/२०१६ तसेच दिवाणी न्यायाधिश (क.स्त.), मुरबाड यांनी दिनांक ३०/७/२०१६ च्या पत्रान्वये मुख्याधिकारी, नगरपंचायत, मुरबाड यांना विनंती केली असता, नगरपंचायतीकडे न्यायालयीन इमारत बांधण्याकरीता कोणतीही रिक्त जागा उपलब्ध नसून सद्य:स्थितीत असलेल्या न्यायालयाच्या जागे व्यतिरिक्त मोकळी असलेली जागा न्यायालयाच्या इमारतीकरीता वापरण्यात यावी असे मुख्याधिकारी, नगरपंचायत, मुरबाड यांनी दिनांक १६/८/२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे.

सबब, इमारत बांधकामाकरीता जागा उपलब्ध झाल्यानंतर मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या मान्यतेने नवीन इमारत बांधण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील स्वातंत्र्यसैनिकांबाबत करावयाची कारवाई**

**(३१) ९६०७१ (३०-०१-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वातंत्र्यलढ्यात कोणत्याही प्रकारचा सहभाग नसताना स्वातंत्र्यसैनिकांच्या पाल्यांनी राखीव कोट्यातून शासकीय सेवेत नोकरी मिळविलेल्या २९८ स्वातंत्रसैनिकांचे निवृत्ती वेतन व अन्य सवलती तात्काळ प्रभावाने बंद करण्याच्या सूचना पालकर आयोगाने दिनांक २२ ऑगस्ट, २००५ रोजी वा त्या सुमारास बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) तसेच युतीच्या काळात स्वातंत्रसैनिक गौरव समितीकडून स्वातंत्र्यसैनिक असल्याचे प्रमाणपत्र मिळविलेल्या १०६ जणांवर बडतर्फीची कारवाई संबंधित विभाग प्रमुख करणार असल्याचे दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत अद्यापपर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१८) :** (१) बीड जिल्हयातील स्वातंत्र्यसैनिकांच्या निवृत्तीवेतन प्रकरणाच्या फेरपडताळणीसाठी दिनांक २२.८.२०१५ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने नेमण्यात आलेल्या मा.सेवानिवृत्त न्यायमूर्ती पालकर यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय आयोगाच्या शिफारशीवर कार्यवाहीच्या अनुषंगाने दिनांक ११.२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये २९८ बोगस स्वातंत्र्यसैनिकांना दिलेले स्वातंत्र्यसैनिक सन्मान निवृत्तीवेतन व्याजासह वसूल करण्याची तसेच त्यांच्या पाल्यांना देण्यात आलेली नामनिर्देशने रद्द करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत.

(२) तसेच या २९८ बोगस स्वातंत्र्यसैनिकांच्या ज्या पाल्यांना नोक-या देण्यात आलेल्या आहेत त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी नियुक्ती प्राधिका-यांनी देऊन त्यांना सेवेतून कमी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक २५.२.२०१४ अन्वये संबंधित नियुक्ती प्राधिका-यांना कळविले आहे. बोगस स्वातंत्र्यसैनिकांचे नामनिर्देशित पाल्य म्हणून नोकरी मिळविणा-या उमेदवारांची संख्या १०७ असून ४ पाल्यांना सेवेतून कमी करण्यात आले आहे.

(३) जिल्हाधिकारी, बीड यांचेकडून दिनांक २९.८.२०१७ व दिनांक ६.९.२०१७ रोजी १०६ पाल्यांना देण्यात आलेले नामनिर्देशन रद्द करण्यात आलेले आहे. दरम्यान, जिल्हाधिका-यांच्या सदर दिनांक ६.९.२०१७ च्या आदेशाविरुध्द तसेच सेवेतून काढून टाकल्याच्या आदेशाविरुध्द मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे याचिका दाखल करण्यात आल्या असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केंद्र शासनाच्या "उडान" अंतर्गत सर्वसामान्य नागरिकांना स्वस्तात विमान सेवा देण्याबाबत**

**(३२) ९६३०० (०६-०१-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या "उडान" अंतर्गत सर्वसामान्य नागरिकांना स्वस्तात विमान प्रवास देणा-या योजनेनुसार राज्यात सोलापूर, कोल्हापूर, जळगांव, नाशिक आणि नांदेड मधून मुंबई विमानसेवेच्या मुंबई विमानतळाचे व्यवस्थापन करणा-या जीव्हीके कंपनीने निश्चित केलेल्या वेळापैकी सहा वेळा गुजरातमधील पोरबंदर, सुरत आणि कोडला विमानतळाने पळविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील प्रशासनाने तांत्रिक बाबी पूर्ण करण्यास दिरंगाई केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे व तद्‌नुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१८) :** (१), (२) व (३) सद्यस्थितीत "उडान" योजनेंतर्गत राज्यात नाशिक-मुंबई-नाशिक, नाशिक-पुणे-नाशिक, जळगाव-मुंबई-जळगाव, नांदेड-मुंबई-नांदेड तसेच नांदेड-हैदराबाद-नांदेड अशा विमानसेवा सुरु आहेत. कोल्हापूर येथील विमानसेवा सुरु करण्यास आवश्यक सुविधा राज्य शासनाने पुरविल्या असून तेथून विमानसेवा सुरु करण्यास केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे. सोलापूर (होटगी) विमानतळाबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज, आजरा, चंदगड तालुक्यातील**
**घरफोडी व अवैध धंद्‌यांचे वाढते प्रमाण**

**(३३) ९६७०४ (०६-०१-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज, आजारा चंदगड तालुक्यात अलीकडे घरफोडी व अवैध धंद्‌यांचे प्रमाण वाढले असून गडहिंग्लजमधील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे घरात

दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास न्यायाधीशांचे निवासस्थान फोडून मौल्यवान वस्तू, एअर बॅग व इतर घरगुती वापरातील साहित्याची चोरी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, उक्त तिन्ही तालुक्यातील चोरी व अवैध धंद्याच्या प्रकरणाला आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१८) :** (१) व (२) गडहिंग्लज, आजरा, चंदगड तालुक्यात घरफोडी या सदराखाली सन २०१६ मध्ये ३३ गुन्हे दाखल आहेत व सन २०१७ मध्ये १९ गुन्हे दाखल आहेत. तसेच अवैध धंदे या सदराखाली सन २०१६ मध्ये ८० गुन्हे तर सन २०१७ मध्ये १२८ गुन्हे दाखल आहेत.

गडहिंग्लजमधील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या घरी चोरी झाल्याप्रकरणी गडहिंग्लज पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २११/२०१७ भा.दं.वि. कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे दि. ०३/१०/२०१७ रोजी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर तालुक्यात अवैध धंद्यांना आळा घालण्याच्या दृष्टीने अचानक नाकाबंदी, रात्रगस्त, पेट्रोलींग करण्यात येते. तसेच अवैध धंदे बंद असुन, पोलीसांची नजर चुकवून तसेच मोबाईलद्वारे अवैध धंदे करणा-या इसमांचा शोध घेवून त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत

**(३४) ९६८८४ (०६-०१-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये (आयटीआय) तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात गत ३३ वर्षापासून वाढ झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख प्रशिक्षण देणाच्या उद्देशाने सन १९६० मध्ये स्थापन झालेल्या या संस्थामधील प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षिताच्या विद्यावेतनामध्ये वाढ न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार विद्यार्थ्यांना सध्या दरमहा मिळणाऱ्या रुपये ६० इतक्या अल्प वेतनात वाढ करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१६-०२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील एकूण प्रशिक्षणार्थ्यांपैकी आर्थिकदृष्टया मागास असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रू. ४०/- तसेच मागासवर्गीय प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रू. ६०/- याप्रमाणे विद्यावेतन देण्यात येते. औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

---

**गडहिंग्लज येथील रिक्त झालेली न्यायालयाची इमारत तहसीलदार कार्यालयास देणेबाबत**

**(३५) ९६९२४ (०६-०१-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज येथे न्याय विभागाकडे असलेली न्यायालयीन इमारत सध्या नवीन जागेमध्ये स्थलांतरीत झाल्यामुळे जुनी इमारत रिक्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त झालेली न्यायालयाची जूनी इमारत तहसिलदार कार्यालयास देण्याविषयी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना पत्राद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर न्यायालयाची जूनी इमारत तहसिलदार कार्यालयास देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०२-२०१८) :** (१) होय, सदर जुनी इमारत दि. ९.४.२०१७ रोजी रिक्त झाली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) उप विभागीय अधिकारी, गडहिंग्लज यांनी न्यायालयाची जूनी इमारत तात्पुरता वापरासाठी हस्तांतरित करण्यात यावी. अशा केलेल्या विंनंतीबाबत जिल्हा व सत्र न्यायाधीश,गडहिंग्लज यांनी दि. १९.१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांना कळविले आहे. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दि. ९ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने अभिप्राय देण्याची विनंती शासन पत्र दि.२१.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये उच्च न्यायालय, मुंबई यांना करण्यात आली आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २३५ नुसार दुय्यम न्यायालयांचे सर्व नियंत्रण मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे आहे. यास्तव, गडहिंग्लज न्यायालयाची जूनी इमारत तहसिलदार कार्यालयास देण्यात यावी किंवा कसे याबाबतचा निर्णय मा. उच्च न्यायालयाकडून घेण्यात येईल.अद्याप याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नेवासा शहरात (जि.अहमदनगर) पोलिस कर्मचा-यांना राहण्याकरिता असलेल्या तीन वसाहतीपैकी केवळ एकाच वसाहतीचा वापर होत असल्याबाबत

**(३६) ९७२७९ (०६-०१-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा शहरात (जि.अहमदनगर) येथे पोलिस कर्मचा-यांना राहण्याकरिता असलेल्या तीन वसाहतीपैंकी केवळ एकाच वसाहतीचा वापर होत असून दोन वसाहती अनेक वर्षापासून बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथील पोलिस कर्मचा-यांना इतरत्र भाड्याच्या घरात रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पोलिस कर्मचा-यांच्या वसाहतीची दुरूस्ती वा नविन वसाहत बांधण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१८) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र राज्य व पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मार्फत नेवासा पोलीस ठाणे येथील निवासस्थानाचे बांधकाम करण्याकरिता वास्तुशस्त्रज्ञ यांची नेमणूक केलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षाचे आधुनिकीकरण करण्याबाबत

**(३७) ९७३०७ (०६-०१-२०१८). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षाचे आधुनिकीकरण करण्याचा निर्णय शासनाने माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार किती निधीची तरतूद केली आहे व सदरची कामे किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, पोलीस नियंत्रण कक्षाचे आधुनिकीकरणाबाबत अद्यापर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१८) :** (१) होय.

(२) सदर प्रकल्पासाठी पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरणाकरिता आवश्यक असणाऱ्या एकूण रु.३८४.५२ कोटी व त्याअनुषंगाने वरळी, मुंबई येथे उभारावयाच्या संनियंत्रण, नियोजन व विश्लेषण केंद्रासाठी आवश्यक असणाऱ्या रु.४४.५४ कोटी अशा एकूण रु.४२९.०६ कोटींच्या खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या विनंती प्रस्तावानुसार यशस्वी निविदाकराला कार्यादेश दिल्यापासून सदर प्रकल्प १ वर्षात पूर्ण करावयाचा आहे.

(३) राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षाचे आधुनिकीकरण प्रकल्पासाठी आवश्यक साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील चेंबूर, गव्हाणपाडा येथे तेल कंपनीची पाईपलाईन फोडून झालेली डिझेलची चोरी

**(३८) ९७५९० (०६-०१-२०१८). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूर, गव्हाणपाडा येथे भारत पेट्रोलियम कंपनीच्या भिंतीलगत टँकर पार्किंग करुन भूमिगत डिझेल पाईपला टॅपिंग करुन डिझेल चोरी करणाऱ्या टोळीला आरसी एक पोलीसांनी अटक केल्याची घटना माहे सप्टेंबर, २०१७ च्या तिसऱ्या सप्ताहामध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार डिझेलची चोरी करणाऱ्या टोळीवर कारवाई तसेच भविष्यात अशाप्रकारे डिझेल चोरी होऊ नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर घटनेची चौकशी करुन संबंधीत टोळीवर आरसीएफ पोलीस ठाणे, चेंबुर येथे गु. र. क्र.२४२/२०१७, भा.दं.वि. कलम ३७९, २८५, ४११, ३४ सह कलम १५(२) पेट्रोलियम व मिनरल पाईपलाईन कायदा १९६२ व कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अधिनियम १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्यात एकुण १४ आरोपीना अटक करण्यात आली असुन १३ आरोपीना मा. न्यायालयाने जामीन मंजुर केला, तसेच १ आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे. सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

सदर गुन्ह्यात अंदाजे रु. ३,५०,०००/- चे डिझेल इंधन चोरीस गेले आहे. डिझेल चोरी झालेला परिसर व पेट्रोलियम कंपनीचे पाईपलाईनवर लक्ष ठेवण्याकरिता संबंधित कंपनीचे सुरक्षारक्षक व सी.आय.एस.एफ. पोलिसांची सतत गस्त ठेवली जात आहे. तसेच, याबाबत संबंधित कंपनीच्या प्रबंधकांना योग्य ती काळजी घेण्याचे व कोणताही अनुचित प्रकार घडु नये तसेच चोरी होऊ नये याकरिता पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदे तालुक्यातील (जि.अहमदनगर) काष्टी रेल्वे स्थानकात पडलेला दरोडा**

**(३९) ९७७४४ (०६-०१-२०१८). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदे तालुक्यातील (जि.अहमदनगर) काष्टी रेल्वे स्थानकात दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दरोडेखोरांनी दगडफेक करुन दोन लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने पळविल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर दरोडेखोरांचा तपास करुन चोरी गेलेला ऐवज हस्तगत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१८) :** (१), (२) व (३) पुणे-बिलासपूर गाडी काष्टी रेल्वे स्टेशन येथे थांबुन सुटेलेनंतर तीन ते चार इसमांनी बाहेरुन वेग वेगळ्या बोगीच्या खिडकितुन हात घालून, महिला प्रवाशांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र ओढुन तोडुन, जबरीने चोरुन व इतर सहप्रवाशांचे मोबाईल चोरुन गाडीवर दगडफेक केलेबाबत अहमदनगर लोहमार्ग पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ५४/२०१७ भा.दं.वि.कलम ३९२,३४ व भा.रे.का. १५२ अन्वये दि. २८/१०/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उक्त गुन्ह्यात एकुण २,९०,०००/- रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेलेला आहे.
सदर प्रकरणी दोन आरोपींना अटक केली असुन, यापैकी एका आरोपीस जामिन मंजूर झाला आहे. इतर दोन संशयित आरोपींची नावे निष्पन्न झाली असुन, त्यांचा तपास सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**मोहोपाडा पाताळगंगा (ता.पनवेल, जि.रायगड) अतिरिक्त एमआयडीसीत कासप गावाजवळील मे.इंद्रायणी सेल्स प्रा.लि.आणि मे. प्रिंट इट इंडिया प्रा.लि. या कंपनीतील कामगारांना कामावरून काढून टाकल्याबाबत**

**(४०) ९८२५६ (०६-०१-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) मोहोपाडा पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसीत कासप गावाजवळील मे.इंद्रायणी सेल्स प्रा.लि., आणि मे. प्रिंट इट इंडिया प्रा.लि. या नावाच्या कंपनी एकाच ठिकाणी एकाच पत्त्यावर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीतील महिला कामगारांसह १३ कामगारांना कोणतीही पूर्व सूचना न देता माहे ऑगस्ट] २०१७ मध्ये वा त्या दरम्यान कामावरून कमी करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामावरून कमी केलेल्या कामगारांसह सदर कंपनीच्या इतरही कामगारांनी कंपनीच्या गेट बाहेर दिनांक १९ ऑगस्ट २०१७ रोजी वा त्या सुमारास निषेध व बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंपनीतून कमी करण्यात आलेल्या सर्व कामगारांना कंपनीत पूर्ववत कामावर घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२४-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) मे. इंद्रायणी सेल्स प्रा.लि.,मधील ७ व मे. प्रिंट इट इंडिया प्रा.लि. मधील ६ अशा एकुण १३ कामगारांना दि. १७.०८.२०१७ रोजीच्या कामगार कपात सूचनेनुसार व्यवस्थापनाने कामावरून कमी केले होते.

(३) कामावरून कमी केलेल्या व कंपनीतील इतर कामगारांनी दि.१८.०८.२०१७ ते दि.२१.०८.२०१७ या कालावधीत आस्थापनेच्या गेटसमोर निषेध व धरणे आंदोलन केले होते.

(४) या संदर्भात तोडगा काढण्यासाठी कामगार उप आयुक्त यांच्या कार्यालयात दि.०८.०८.२०१७, दि.२१.०८.२०१७, दि.११.०९.२० १७ व दि. २६.०९.२०१७ रोजी बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. व्यवस्थापनाने कामावरून कमी केलेल्या १३ कामगारांना दि. २२.०८.२०१७ पासून पुन्हा कामावर घेतले आहे. दि.२२.०८.२०१७ पासून कामगारांनी संप व धरणे आंदोलने मागे घेऊन काम सुरु केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था निधी अभावी बंद होण्याच्या मार्गावर

**(४१) ९८३२३ (०६-०१-२०१८). अॅड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात अकुशल कामगारांना/युवकांना कुशल बनवून त्यांना रोजगाराच्या संधी देण्यासाठी राज्यात स्वतंत्र कौशल्य विकास मंत्रालयाची निर्मिती करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ७२५२ प्रशिक्षण संस्थांची नोंदणी व त्यांना मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य सरकारच्या निधी अभावी या प्रशिक्षण संस्था बंद होण्याच्या मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर प्रशिक्षण संस्थांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०८-०२-२०१८) :** (१) होय. राज्यात सन १९९७ मध्ये रोजगार व स्वंयरोजगार या स्वतंत्र मंत्रालयीन विभागाची निर्मीती करण्यात आली असुन त्यांचे दिनांक १५/०१/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये कौशल्य विकास व उद्योजकता विभाग असे नामकरण करण्यात आले आहे.

(२) नाही. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीकडे माहे डिसेंबर,२०१७ अखेर एकुण २९११ प्रशिक्षण संस्था सुचिबध्द करण्यात आलेल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही

---

**मुंबई उपनगरीय रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेची धुरा वाहणाऱ्या लोहमार्ग पोलीसांच्या मनुष्यबळात वाढ करण्याबाबत**

**(४२) ९८३३४ (०६-०१-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरीय रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेची धुरा वाहणा-या लोहमार्ग पोलीसांच्या मनुष्यबळात सन १९८२ पासून मंजूर पदामध्ये वाढ झालेली नाही, त्यामुळे पोलीस मनुष्यबळाच्या अभावामुळे कार्यरत पोलीस कर्मचा-यांवर ताण पडत असल्याचे पोलीस आयुक्त, लोहमार्ग यांनी राज्य शासनाकडे अहवाल पाठवून मंजूर पदांमध्ये वाढ करावी, अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूर पदामध्ये वाढ न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, मंजूर पदामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०३-२०१८) :** (१), (२) व (३) सन १९८२ पासून पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई यांच्या आस्थापनेवरील मनुष्यबळामध्ये शासनाने वेळोवेळी वाढ केलेली असून सन १९८२ ते सन २०१४ या कालावधीमध्ये एकुण १९४७ इतके वाढीव मनुष्यबळ उपलब्ध

करुन देण्यात आले आहे. सद्यस्थितीत पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई यांच्या आस्थापनेवर एकुण ४०१९ इतके मनुष्यबळ मंजूर आहे. अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी लोहमार्ग पोलीसांच्या मनुष्यबळात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर केला आहे. सदर प्रस्ताव पोलीस महासचांलक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या स्तरावर तपासण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड शहरात आढळेल्या बनावट नोटांचे संबंध मध्यप्रदेशातील भिंड जिल्ह्याशी असल्याबाबत**

**(४३) ९८६३२ (०६-०१-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड शहरात (जि.बीड) आढळलेल्या बनावट नोटांचे संबंध मध्यप्रदेशातील भिंड जिल्ह्याशी असल्याची बाब दिनांक २६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार किती जणांना अटक करत आली आहे तसेच, सदर रॅकेट उदध्वस्त करण्याच्या दृष्टीने पोलीसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१८) :** (१), (२), (३) व (४) सदर प्रकरणातील आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, बरोही जि. भिंड मध्यप्रदेश येथे गु.र.नं.८०/२०१७ कलम ४८९ (अ) (ब) (क), सह आर्म ॲक्ट कलम २५/२७ अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासकामी मध्यप्रदेश पोलीसांनी पेठ पोलीस स्टेशन, बीड यांच्याशी संपर्क साधुन त्यांच्या मदतीने आरोपीचा शोध घेवुन त्याच्याकडे विचारपुस केली असता आरोपीने त्याचा मेहुणा याचे शिवनी रोडवरील गांधीनगर येथील प्लॉटवर प्रिंटरच्या सहाय्याने बनावट नोटा बनवित असल्याचे कबुल केले आहे. सदर ठिकाणी १,६०,०००/- रुपये किंमतीच्या १०० रुपयांच्या बनावट नोटा, एक प्रिंटर मशीन, नोटा बनविण्यासाठी वापरण्यात येणारा कागद इत्यादी साहित्य हस्तगत करुन आरोपीस बरोही पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात देवुन पेठ पोलीस स्टेशनच्या सीसीटीएनएसला नोंद घेण्यात आलेली आहे.
(५) विलंब झालेला नाही.

---

**आदिवासींच्या जागा खोट्या प्रमाणपत्रांच्या आधारे बळकावणा-यांवर कारवाई करण्याबाबत**

**(४४) ९९००० (०६-०१-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासींच्या जागा (पदे) बिगर आदिवासींनी खोट्या प्रमाणपत्रांच्या आधारे बळकावल्या आहेत अशांवर कारवाई करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले असतानाही राज्य शासनाकडून अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत आदिवासी संरक्षण समितीच्या वतीने खोट्या प्रमाणपत्रावर आदिवासींच्या जागा बळकावणा-यांवर कारवाई करण्याकरीता मा.मुख्यमंत्र्यांना जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊन अद्याप दोषींवर कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, आदिवासींच्या जागा बळकावणा-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे व तद्नुसार शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०२-२०१८) :** (१) ते (४) आदिवासीच्या जागा (पदे) बिगर आदिवासीनी खोटया प्रमाणपत्रांच्या आधारे बळकावल्या आहेत, अशांवर कारवाई करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी दिले आहे, हे खरे आहे. त्याअनुषंगाने खोटया प्रमाणपत्राच्या आधारे आदिवासींच्या जागा बळकावणाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात शासन स्तरावर विविध लोकप्रतिनिधी तसेच विविध संघटनांकडून निवेदने प्राप्त झालेली आहेत. त्याअनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या दृष्टीने शासनाच्या धोरणाच्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाकडे नस्ती अभिप्रायार्थ सादर केली होती. प्रस्तुत प्रकरण विधी व न्याय विभागाने राज्याचे महाअधिवक्ता यांचेकडे अभिप्रायार्थ सादर केली होती. या प्रकरणी त्यांचे अभिप्राय प्राप्त झाले असून,मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बनावट शस्त्र परवान्याच्या आंतरराज्यीय टोळीतील प्रवीण परमार याच्या अटकेबाबत**

**(४५) ९९०५२ (०६-०१-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे पोलिसांनी दोन वर्षांपूर्वी नेस्तनाबूत केलेल्या बनावट शस्त्र परवान्याच्या आंतरराज्यीय टोळीतील प्रवीण परमार नावाचा आरोपी आजही मोकाट असल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणातील आरोपीला अद्यापही अटक न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या आरोपीला अटक करून कारवाई करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे होते.

परंतु, नमूद आरोपीचा शोध घेतला असता तो दिनांक ८.१२.२०१७ रोजी पालन रेल्वे स्टेशन, राजस्थान येथे मिळून आल्याने त्यास राजस्थान येथून ताब्यात घेवून दिनांक ९.१२.२०१७ रोजी अटक करण्यात आली आहे.
(३) सदर प्रकरणात ११ रिव्हॉल्वर, १३ पिस्टल, १२ रायफल असे एकूण ३६ अग्निशस्त्र व एकूण ५१३ काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. या प्रकरणी नौपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३३५/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ सह आर्म ॲक्ट ३, २५, ३० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून नमूद गुन्ह्यातील ३४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्ह्यातील ३२ आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून अन्य दोन आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**त्र्यंबकेश्वर मंदिरामधिल (जि.नाशिक) बेकायदा शुल्क आकारणी करून दर्शन घेणे बंद करण्याबाबत**

**(४६) ९९२५५ (०६-०१-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील तिर्थक्षेत्र असलेल्या त्र्यंबकेश्वर मंदिरात शुल्क आकारून दर्शन घेण्यासाठी प्रती भाविक १०० रुपयांची शुल्क आकारणी केली जात असल्याचे माहे जुलै-२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याविरोधात येथील एका विश्वस्ताने राज्याच्या विधी व न्याय विभागाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या तक्रारीची दखल घेऊन बेकायदा शुल्क आकारणी करून दर्शन घेणे बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

देवदर्शनासाठी प्रती व्यक्ती रु.२००/- याप्रमाणे शुल्क आकारण्यात येते.

(२) हे खरे आहे.
(३) तक्रारीच्या अनुषंगाने निरिक्षकाकडून चौकशी करण्यात आली असून त्यात खालील मुद्दे आढळून आले:-

श्री त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टच्या मंदिराबाहेर देणगी दर्शन कोणालाही बंधनकारक नाही, अशा प्रकारचा फलक लावण्यात आलेला आहे.

मंदिरात शुल्क आकारुन देवदर्शन घेण्याबाबतचा ठराव देवस्थानाचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. देणगी दर्शन घेणाऱ्या व्यक्तीला त्याची पावती दिली जात असून प्रती वर्षी सनदी लेखापालाकडून ऑडीट केले जाते. सामान्य रांगेत उभे राहून दर्शन घेणाऱ्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे दर्शन शुल्क आकारण्यात येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला शहरा नजिकच्या सोमठाणा येथील विठ्ठल संस्थानाची जमिन ट्रस्टीने परस्पर विक्री केल्याबाबत

**(४७) ९९४२६ (०६-०१-२०१८). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शहरा नजिकच्या सोमठाणा येथील विठ्ठल संस्थानाची जमिन ट्रस्टीने परस्पर विकल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार जमिन विकणाऱ्या ट्रस्टींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) :** (१) सोमठाणा येथील विठ्ठल संस्थानाची जमिन ट्रस्टीने परस्पर विकल्याबाबत कोणतीही तक्रार ऑक्टोबर,२०१७ किंवा त्या दरम्यान प्राप्त झालेली नाही. परंतु अकोला जिल्ह्यातील निरीक्षक यांनी सोमठाणा गावाचे तलाठी यांची भेट घेऊन न्यासाचे (नोंदणी क्र.ए १११६) बाबत चौकशी केली असता भूमापन क्र.१९, सुधारण पध्दती वर्ग-१ फेरफार क्र.७४४ व ७४५ दि.१४.०२.२०१३ नुसार श्रीम.उषाताई पावसाळे यांनी १.०० हे.आर. व श्रीम. रेखा पाटील यांनी १.०० हे.आर. जमिन विकत घेतल्याचे दिसून येते.सदरच्या व्यवहाराबाबत संस्थानाचे ट्रस्टी यांनी धर्मादाय सहआयुक्त, अमरावती यांच्या कार्यालयात न्यासाची जमिन विकण्याबाबत परवानगी मिळण्याकरिता सन २००८ पासून कुठलाही अर्ज केलेला दिसून येत नाही.
(२) उपरोक्त न्यास नोंदणी क्र.ए-१११६ बाबतच्या मालमत्तेसंदर्भात व ट्रस्टवर प्रशासक नियुक्ती करण्याबाबतच्या तक्रारीवर निरिक्षक चौकशी क्र.३८/१५ सुरु असून तक्रारदार यांचा जबाब नोंदविण्यात आलेला आहे.

(३) न्यासाबाबत सन २०१५ मध्ये प्राप्त झालेल्या तक्रारीच्या संदर्भात निरिक्षक चौकशी प्रलंबित असून ही प्राधान्याने निकाली काढण्याबाबत संबंधित निरिक्षक यांना आदेशित करण्यात आलेले आहे.
(४) निरिक्षक चौकशीच्या अनुषंगाने अहवाल प्राप्त झाल्यानंतर विश्वस्तांवर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

---

**चिखलठाणा (जि.औरंगाबाद) विमानतळावरून आंतरराष्ट्रीय विमानवाहतुक सुरू करणेबाबत**

**(४८) ९९९०९ (०६-०१-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय उत्पादन शुल्क व सीमा शुल्क परिषदेने चिखलठाणा (जि.औरंगाबाद) विमानतळाचा मानांकन यादीत समावेश केला असून सदर विमानतळ आंतरराष्ट्रीय विमान वाहतुकीसाठी देशातील १९ वे विमानतळ ठरले आहे तरीही शासनाने शिर्डी विमानतळ पुढे केल्यामुळे चिखलठाणा विमानतळ याबाबतीत मागे पडले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वास्तविक १० विमान सेवांनी येथे आंतरराष्ट्रीय सेवा देण्यासाठी होकार दिला व बुद्ध विचारसरणी चे भक्त अजंठा वेरूळ ते श्रीलंका जपान असे भरपूर प्रवासी असूनही हे विमानतळ उपेक्षित ठरते आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चिखलठाणा विमानतळावरून आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) :** (१), (२) व (३) औरंगाबाद विमानतळ हे भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाच्या मालकीचे आहे. याअनुषंगाने त्या प्राधिकरणाने असे कळविले आहे की, औरंगाबाद विमानतळ सन २०१५ मध्ये Custom Airport म्हणून घोषित करण्यात आले असून सदर विमानतळ आंतरराष्ट्रीय विमान वाहतुकीसाठी सज्ज आहे. आशियाई तसेच युरोपियन देशांतून हजारो प्रवासी मुंबई किंवा दिल्ली मार्गे या विमानतळावर येतात. Direct International Flight सुरु करण्यासाठी विमानतळ व्यवस्थापनाकडून विमान वाहतूक कंपन्यांना वेळोवेळी विनंती करण्यात आलेली आहे. यांपैकी, काही विमान वाहतूक कंपन्यांनी औरंगाबाद विमानतळावरुन आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक सेवा सुरु करण्यास होकार दर्शविला आहे. परंतु, प्रत्यक्षात विमान वाहतूक कधी सुरु करणार, याबाबत निश्चित सांगितले नाही.

तथापि, प्रस्तुत प्रकरणी औरंगाबाद व परिसराचे पर्यटनाचे महत्त्व लक्षात घेऊन या शहराशी आंतरराष्ट्रीय विमानवाहतूक वाढविण्यासाठी नागरी विमान मंत्रालयाला प्राधान्याने निदेश द्यावेत, अशी मा.मुख्यमंत्री महोदयांनी मा.पंतप्रधान महोदयांना दि.८.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरखेड (जि.यवतमाळ) येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापन करण्याबाबत**

**(४९) १०२१०३ (०६-०१-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापन करण्याबाबत माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान पासून स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार मा.विधी व न्याय राज्यमंत्री यांना लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व तद्नुसार शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०३-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) राज्यात कोठे न्यायालय स्थापन करावयाचे याबाबत (प्रलंबित प्रकरणांची संख्या व अस्तित्वातील पायाभूत सुविधा विचारात घेऊन) मा.उच्च न्यायालय मुंबई यांचे स्तरावर गठीत The Establishment of Courts Committee ही समिती शासनास शिफारस करते व त्यानंतर मंत्रीमंडळाच्या मान्यतेने शासन स्तरावर निर्णय घेण्यात येतो. मा.विधानसभा सदस्य यांचेकडून प्राप्त निवेदने प्रबंधक, मा.उच्च न्यायालय मुंबई यांना दिनांक १७.०५.२०१७ रोजी पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात आली आहेत. उमरखेड येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय तसेच, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापनेबाबत मा.उच्च न्यायालयाची शिफारस शासनास अद्याप प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुर्ला (मुंबई) येथील श्रमजीवी नगरातील अल्पवयीन मुलीने छेडछाड करणाऱ्या तरुणास विरोध केल्याने मुलीला अमानुष मारहाण केल्याचे प्रकरण**

**(५०) १०३५११ (०६-०१-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला (मुंबई) येथील श्रमजीवी नगरातील अल्पवयीन मुलीने छेडछाड करणाऱ्या तरुणास विरोध केल्यामुळे सदर अलपवयीन मुलीस दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा वा त्यासुमारास अमानुष मारहाण करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मारहाणीत मुलगी गंभीररित्या जखमी झाल्याने तिला राजावाडी रुग्णालयात दाखल करावे लागले असतानाही नेहरुनगर पोलीसांनी आरोपीला अदखलपात्र गुन्ह्याखाली अटक केल्याने मा.न्यायालयाने आरोपीला जामीन मंजूर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांवर व सदर छेडछाड करणाऱ्या तरुणावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १८/१०/२०१७ रोजी नमूद गुन्ह्यात नेहरू नगर पो स्टे येथे गु र क्र २७१/१७ कलम ३२४,५०४,५०६ भादवि गुन्हा नोंदविण्यात आला. नमूद गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या आरोपीस मा. न्यायालयाने जामिनावर मुक्त केले. तथापि, गुन्ह्यातील तपासानुसार सी.सी.टि.व्ही. फुटेज, प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचे जबाब व इतर पुराव्यावरून यातील अटक आरोपीने अल्पवयीन बळीत मुलीचा विनयभंग करून तीला मारहाण करून तीचे नाकास गंभीर दुखापत केल्याचे निष्पन्न झाल्याने नमुद गुन्ह्याच्या कलमामध्ये ३२६,३५४(अ),३५४(ड),५०९ भादवि सह कलम ८,१२ पोक्यो अंतर्गत वाढ करण्यात येवुन मा. न्यायालयाचे परवानगीने दिनांक २१/१०/२०१७ रोजी नमुद गुन्ह्यातील आरोपीस फेर अटक केली आहे. सद्यस्थितीत ऐरोपीस मा.न्यायालयाने दिनांक ३१/१०/२०१७ रोजी जामिन मंजूर केला आहे.

सदर प्रकरण गांभिर्याने न हाताळल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक व प्रथम तपासी अधिकारी यांचीची अकार्यकारी शाखेत बदली करण्यात येऊन त्यांचे अनियमितते बाबतची प्राथमिक चौकशी सहायक पोलीस आयुक्त, देवनार यांचे मार्फत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.